91.78

भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५

(१८७५ चा अधिनियम क्रमांक ९)

[१ ऑक्टोबर, १९७८ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Indian Majority Act, 1875

## (Act No. 9 of 1875)

**[ As in force on the 1st October, 1978 ]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९७९

[किंमत—४० पैसे]

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची यादी

१. 'पालक आणि पाल्य अधिनियम, १८९०' (१८९० चा ८).

२. 'भारत शासन (भारतीय कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९३७'.

३. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०'.

४. 'भाग ख राज्ये (कायदे) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ३).

५. 'पाँडिचेरी (कायद्यांचे विस्तारण) अधिनियम, १९६८' (१९६८ चा २६).

(शा.मु.मु.) एम् ४०९६—१ (५३०-९-८०)

# भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५

## कलमांचा क्रम

### प्रास्ताविका

कलमे

१. संक्षिप्त नाव.

स्थानिक विस्तार.

प्रारंभ आणि प्रवर्तन.

२. व्यावृत्ती.

३. भारतात अधिवासी असलेल्या व्यक्तींचे सज्ञानतेचे वय.

४. सज्ञानतेचे वय कसे मोजावयाचे.

# भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५*

## (१८७५ चा अधिनियम क्रमांक ९)

[२ मार्च, १८७५]

**सज्ञान वयासंबंधीचा कायदा विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, [1][भारतात] अधिवासी असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत अज्ञानदशेचा कालावधी वाढवणे, आणि सज्ञान वयासंबंधात आहे त्यापेक्षा अधिक एकरूपता आणि निश्चितता साधणे समयोचित आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :— प्रास्ताविका.

१. या अधिनियमास 'भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

[2][त्याचा विस्तार [3][जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून] संपूर्ण भारतभर आहे.] स्थानिक विस्तार.

आणि तो पारित झाल्यापासून तीन महिने संपल्यानंतरच अंमलात येईल आणि परिणामक होईल. प्रारंभ आणि प्रवर्तन.

२. यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे,— व्यावृत्ती.

(क) पुढील बाबतीत (म्हणजेच),–विवाह, देज, घटस्फोट आणि दत्तकग्रहण यांसंबंधी व्यवहार करण्याची कोणत्याही व्यक्तीची क्षमता ;

(ख) [4][भारताच्या कोणत्याही नागरिकवर्गाचा] धर्म किंवा धार्मिक विधी आणि परिपाठ ; किंवा

(ग) स्वतःला लागू असणाऱ्या कायद्याअन्वये हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी सज्ञान झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीची क्षमता,

यांच्यावर परिणाम होणार नाही.

३. पूर्वोक्ताच्या अधीनतेने, [5][ज्या ज्या अज्ञान व्यक्तीचा देह किंवा संपत्ती याबाबत किंवा दोन्हीं-बाबत 'दिवाणी प्रक्रिया संहिता' [6](१८८२ चा १४)-प्रकरण ३१ वे यामध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे दाव्यापुरता नेमलेला पालक सोडून अन्य प्रकारचा पालक त्या अज्ञान व्यक्तीच्या वयाला अठरा वर्षे होण्यापूर्वी न्यायालया-कडून नियुक्त किंवा घोषित करण्यात आलेला आहे किंवा करण्यात येईल अशी प्रत्येक अज्ञान व्यक्ती, आणि ज्या ज्या अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीवर देखरेख करण्याचे काम अज्ञान व्यक्तीच्या वयाला अठरा वर्षे होण्यापूर्वी पाल्याधिकरणाने पत्करलेले आहे किंवा ते पत्करील अशी प्रत्येक अज्ञान व्यक्ती,] [7]'भारतीय उत्तराधिकार अधिनियम' (१८६५ चा १०) यामध्ये किंवा इतर कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, तिच्या वयाला एकवीस वर्षे पूर्ण होतील तेव्हा सज्ञान झाल्याचे मानण्यात येईल—त्यापूर्वी नाही : भारतात अधिवासी असलेल्या व्यक्तींचे सज्ञानतेचे वय.

पूर्वोक्ताच्या अधीनतेने, [1][भारतात] अधिवासी असलेली अन्य प्रत्येक व्यक्ती, तिच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण होतील तेव्हा सज्ञान झाल्याचे मानण्यात येईल-त्यापूर्वी नाही.

४. कोणत्याही व्यक्तीचे वय मोजताना, ती ज्या दिवशी जन्माला आली तो संपूर्ण दिवस समजून हिशोबात धरावा लागेल, आणि ती व्यक्ती कलम ३ च्या पहिल्या परिच्छेदाच्या कक्षेत येत असल्यास, सज्ञानतेचे वय कसे मोजावयाचे.

---

*१९६८ चा अधिनियम २६-कलम ३ व अनुसूची-भाग एक यांद्वारे हा अधिनियम पुढील फेरबदलांसह पाँडिचेरी या संघ राज्यक्षेत्रावर विस्तारित केला.

कलम १ मध्ये अखेरीला पुढील मजकूर दाखल करावा :—

"परंतु, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट पाँडिचेरी या संघ राज्यक्षेत्राच्या रेनों-कान्सना लागू होणार नाही.".

१. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग क राज्ये व भाग ग राज्ये यांमध्ये" या मजकुराऐवजी घातले.

२. किता—कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग ख राज्ये खेरीजकरून" याऐवजी घातले.

३. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे मूळ परिच्छेदाऐवजी घातले.

४. किता—द्वारे "हिज मॅजेस्टीच्या भारतातील कोणत्याही प्रजाजनवर्गाचा" याऐवजी घातले.

५. १८९० चा अधिनियम ८-कलम ५२ द्वारे "ज्या ज्या अज्ञान व्यक्तीचा देह किंवा संपत्ती याबाबत, कोणत्याही न्यायालयाकडून पालक नियुक्त करण्यात आलेला असेल किंवा येईल अशी प्रत्येक अज्ञान व्यक्ती, आणि पाल्याधिकरणाच्या अधिकारितेखाली असलेली प्रत्येक अज्ञान व्यक्ती" या मजकुराऐवजी घातले.

६. आता 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५)-अनुसूची एक-ऑर्डर बत्तीस, पहा.

७. आता 'भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५' (१९२५ चा ३९) पहा.

त्या दिवसाच्या एकविसाव्या वर्षदिनाच्या प्रारंभी आणि ती कलम ३ च्या दुसऱ्या परिच्छेदाच्या कक्षेत येत असल्यास, त्या दिवसाच्या अठराव्या वर्षदिनाच्या प्रारंभी तिला सज्ञानता प्राप्त झाली असे मानण्यात येईल.

**उदाहरणे**

(क्) 'ज्ञ' हा एक जानेवारी, १८५० रोजी [१][भारतात] जन्मला आहे, आणि तो भारताचा अधिवासी आहे. न्यायालयाने त्या व्यक्तीच्या देहाचा पालक नियुक्त केला आहे. एक जानेवारी, १८७१ या दिवशीच्या पहिल्या क्षणी 'ज्ञ' ला सज्ञानता प्राप्त होते.

(ख्) एकोणतीस फेब्रुवारी, १८५२ रोजी 'ज्ञ' [१][भारतात] जन्मला आहे, आणि तो [२][भारताचा अधिवासी] आहे. न्यायालयाने त्याच्या संपत्तीचा पालक नियुक्त केला आहे. अठ्ठावीस फेब्रुवारी, १८७३ या दिवशीच्या पहिल्या क्षणी 'ज्ञ' ला सज्ञानता प्राप्त होते.

(ग्) 'ज्ञ' हा एक जानेवारी, १८५० रोजी जन्मला आहे. तो [१][भारतात] अधिवास संपादन करतो. न्यायालयाने त्याच्या देहाचा किंवा संपत्तीचा कोणताही पालक नियुक्त केलेला नाही, तसेच तो कोणत्याही पाल्याधिकरणाच्या अधिकारितेखाली येत नाही. एक जानेवारी, १८६८ या दिवशीच्या पहिल्या क्षणी 'ज्ञ' ला सज्ञानता प्राप्त होते.

---

[१]. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'भाग क राज्य किंवा भाग ख राज्य' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

[२]. कित्ता--कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग क राज्याचा किंवा भाग ग राज्याचा अधिवासी" याऐवजी घातले.

## THE INDIAN MAJORITY ACT, 1875

## भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| attain majority | .. सज्ञानता प्राप्त होणे | [S.3] |
| domicile | .. अधिवास | [S.4-i11.(*a*)] |
| dower | .. देज | [S.2(*a*)] |
| nonage | .. अज्ञानदशा | [Preamble] |

## भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५

## THE INDIAN MAJORITY ACT, 1875

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिवास | domicile .. | [S.4-ill.(*a*)] |
| अज्ञानदशा | nonage .. | [Preamble] |
| देज | dower .. | [S.2(*a*)] |
| सज्ञानता प्राप्त होणे | attain majority .. | [S.3] |